# आह!

## ऊहापोह आरोग्य हक्कांचा

**साथी संस्थेचं अनियतकालिक**
मार्च २०२३ । वर्ष पहिले । अंक तिसरा

संकलन/ लेखन : हिनाकौसर खान
संपादन : प्रशांत खुंटे

प्रकाशक : साथी



# अनुकंपेचं कपाळ पांढरं!

**कोविडनं कित्येक संसार उधळले. केवळ महाराष्ट्रात सुमारे ७० हजार महिलांना वैधव्य आलं. ‘आरोग्य सुविधांचा अभाव’ हे या अकाली वैधव्यांचं एक कारण. त्यामुळं निराधार महिलांच्या पाठिशी खंबीरपणे उभं राहणं ही शासनाची व समाजाची जबाबदारी. पण दुर्दैवानं अनुकंपा दुबळी पडल्याचं दिसतं. अपवादासाठी काही संवेदनशील संस्था–कार्यकर्त्यांचा पुढाकार आशादायी होता. पण खरंतर कोविड विधवांची संपूर्ण जबाबदारी सरकारनं का घेऊ नये? नागरिकांसाठी किमान आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी शासनाची. मग कोविडची झळ बसली, त्यांची जबाबदारीही सरकारची नव्हे का?**





कोविडची साथ आली, गेली. त्यापाठोपाठ राहिला हजारो स्त्रियांचा एकाकी संघर्ष. सरकार व समाजानं या महिलांचा कितपत विचार केलाय? या स्त्रियांनी पुन्हा कंबर कसलीय. दुसरा पर्याय तरी काय? कोविड आपत्तीच्या गर्भात दुसरं सामाजिक अरिष्ट दडलेलं, याचा ना तेव्हा विचार झाला, ना आता होतोय. कुठलाही पक्ष कोविड विधवांचं पुनर्वसन करू, म्हणून मतं मागताना दिसत नाही. असं का?

कुठलीही आरोग्य समस्या केवळ डॉक्टर-पेशंट-दवाखाने या परिघापुरती नसते. त्या समस्येत समाजाचं चित्रं-चरित्रंही असतं, नीट पाहिलं की ते दिसतं. येथे कोविड विधवांच्या प्रश्नांत आपण आपल्याला पाहू... समाज म्हणून आपण कसे आहोत? याचा आढावा घेऊ...

# कोविड: पुरुषांचा 'काळ'

कोविडच्या तीन लाटा आल्या. तज्ज्ञ सांगतात, या तीनही लाटेत स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचे मृत्यू जास्त झाले. कोविड मृत्यूंचं विश्लेषण आता उपलब्ध आहे. त्यानुसार एकूण संसर्गात पुरुषांचं प्रमाण होतं- ६० %. यापैकी ६६% पुरुषांचं निधन झालं. कोविड संसर्गित महिला रुग्णांच्या मृत्यूंचं प्रमाण होतं - ३३.७%. असं का झालं? कोविडचा संसर्ग पुरुषांमध्ये जास्त का आढळला? नि मृत्यूही पुरुषांचे जास्त का व्हावेत?

'पुरुष घराबाहेर जास्त असतात, कदाचित त्यामुळं पुरुषांमध्ये संसर्गाचं प्रमाण जास्त होतं.' कोविड डेथ ऑडिट कमिटीचे प्रमुख डॉ. अविनाश सुपे नोंदवतात, दुसरं कारण आहे, 'पुरुषांमध्ये कोमोर्बिड रुग्णांचं प्रमाण जास्त होतं.[1]' कोविडनं पुरुषांमधील मृत्यूदर जादा असल्याचं बायोलॉजिकल कारणंही संशोधक सांगताहेत.

आपण आसपास पाहिलं, तर कुटुंबातील कर्ते-कमावते पुरुष कोविडनं जादा वारल्याचं दिसेल. यातले अनेक गरीब व मध्यमवर्गीय होते. या वर्गातील विधवांची अवस्था एरवीही बिकट असते. कोविड आपत्तीनं या महिलांच्या समस्यांना शासकीय अनास्थेचीही किनार मिळाली.

[1] Maharastra : Men's death rate higher, more died than women in all three waves of covid pandemic (ToI, 09/03/20220)



# मदतीसाठी जंग जंग

'महाराष्ट्रात महिला व बाल कल्याण मंत्रालया'नं कोविड विधवांच्या मदतीसाठी 'वात्सल्य योजना' जाहीर केली. या योजनेतून शासनाच्या २५ विविध योजनांचा लाभ कोविड विधवांना मिळणं अपेक्षित होतं. 'टाईम्स ऑफ इंडिया'त प्रसिद्ध झालेल्या बातमीनुसार, २२ हजार कोविड विधवांनी वात्सल्य योजनेचा लाभ मिळावा म्हणून अर्ज केलेला. पण या महिलांना मदत मिळाली नाही. परिणामी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रारही केली. या वृत्तात महिलांनी आपल्या समस्या सांगितल्यात.[2]

नांदेड मधील रूपाली पाटील सांगतात, ''मी योजनेत रजिस्ट्रेशन केलं. त्यानंतर माझ्या खात्यावर पन्नास हजार रुपये जमा झाल्याचा मेसेज आला. पण प्रत्यक्षात खात्यात काहीच आलं नाही. मी अधिकाऱ्यांना वारंवार भेटले. पण काहीच उपयोग झाला नाही.'' बुलढाण्याच्या विजया शिर्के सांगतात, ''माझे मिस्टर कोविडमुळं वारले. मी मदतीसाठी अर्ज केला. तर अर्ज नामंजूर झाला. अधिकारी सांगतात, – तुमच्या मिस्टरांचा मृत्यू मध्यप्रदेशात झाला, त्यामुळं महाराष्ट्र सरकारकडून मदत मिळू शकत नाही.'' चंद्रपूरच्या दिपाली वहाबीटकर म्हणतात, ''अनुदान तर मिळालं नाहीच, इतर कुठल्याही योजनेचा लाभ मिळेल याची खात्री अधिकारी देत नाहीत.''

[2] Maharastra Govt scheme to help covid widows remain on paper, (ToI, 30/03/2022)



## परवड कायम

विधवा महिलांना एकतर योजनांचा लाभ मिळणं मुश्कील होतंय. सरकारनं जाहीर केलेलं अनुदान मिळत नाहीय. त्यातच कर्ज वसुलीसाठी ससेमिराही पाठिशी लागलाय. अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांनी कोविडपूर्वी घर किंवा अन्य कारणांसाठी कर्ज घेतलेली. पण कुटुंबातील कमावती व्यक्ती वारली. आता बँकांच्या नोटिसा कोविड विधवांना येत आहेत. या बँका – 'कर्ज फेडा किंवा घर खाली करा' असं सांगताहेत.

## विम्यापासूनही वंचित

गृहकर्जावरील विमा पॉलिसीत 'कोविड' शब्दच नाही, ही सबब दाखवून कोविड विधवांना विम्याचाही लाभ मिळत नाही. तसंच सुमारे ५०० विधवांपुढे संकट उभं ठाकलंय गृहकर्जाच्या थकलेल्या हप्त्यांचं. 'घरं विकून हप्ते भरा किंवा लिलावासाठी घरं खाली करा' अशा नोटिसा बँकांकडून आल्या आहेत.[3]

नाशिक येथील आरती महाजन यांच्या पतीचं एप्रिल २०२१ मध्ये कोविडनं निधन झालं. त्यांना शासनाकडून भरपाई रक्कम म्हणून पन्नास हजार मिळाले. पण ही मदत खूपच तोकडी ठरलीय. सध्या आरतीताई खाणावळ चालवून उदरनिर्वाह करतात. त्यांच्या पतीनं मृत्यूपूर्वी घरासाठी कर्ज घेतलेलं. त्या कर्जाची २६ लाखांची थकबाकी आता आरतीताईंना फेडावी लागणार आहे. आरतीताईंना बँकेच्या तगाद्याला सामोरं जावं लागतंय.

नाशिकच्याच संगीता मिस्त्रींचे यजमान फेब्रुवारी २०२१ मध्ये कोविडनं वारले. सध्या त्या शिवणकाम करून घरखर्च भागवतात. त्यांना 'ताराराणी स्वयंसिद्धा योजने'ची मदत मिळालेली नाही. पण शासनाकडून ५० हजार रुपयांची मदत मिळाली. संगीताताईंनाही घरावरील कर्ज फेडण्याचं टेन्शन सतावतय. त्या सांगतात, फायनान्स कंपनीचे लोक धमकावताहेत. ते म्हणतात– ''तुम्ही कोर्टात जा, वकील लावा. होम लोनच्या इन्शुरन्समध्ये कोविडचा उल्लेख नाही.'' मी शिवणकाम करून कसंबसं महिन्याला पाच हजार कमावते, दर महिन्याला सहा हजारांचा हप्ता कसा भरू?

[3] https://divyamarathi.bhaskar.com/local/maharashtra/nashik/news/500-covid-widows-burdened-with-home-loans-tagada-to-demolish-houses-130250741.html?media=1

# कोविडपश्चात महिलांचा ‘काळ’



कळंबोलीच्या योजना कांबळे सांगतात, “लॉकडाऊनमध्ये माझ्या नवऱ्याची नोकरी सुटली. आम्ही घरासाठी कर्ज घेतलेलं. ते फेडायचं होतं. नवऱ्याने दुसरी नोकरी शोधली. पण नंतर त्यांना कोविड झाला. त्यांना ॲडमिट करायला दवाखानाच मिळत नव्हता. खूप प्रयत्न केल्यावर एका खासगी दवाखान्यात ॲडमिट करता आलं. ते २२ दिवस तिथं होते. पण ते वाचले नाहीत. दवाखान्याचं बिल साडेसहा लाख झालं. त्यातच सगळी बचत खर्च झाली. शिवाय आधीचं कर्जही आता मला फेडावं लागतंय.” योजनाताईंचं बारावीपर्यंतच शिक्षण झालंय. नोकरी करावी लागेल, याचा त्यांनी कधी विचारच केला नव्हता. आता नवऱ्यापश्चात मात्र त्यांना घराबाहेर पडावं लागलंय. कर्ज फेडण्यासाठी घर विकण्याची नामुष्की त्यांच्यावर आलीय.

हजारो कोविड विधवा अल्पशिक्षित आहेत. नवऱ्यापश्चात मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. पण चांगली नोकरी त्यांना मिळू शकत नाहीय. शासनानं मात्र केवळ ५० हजाराची मदत देऊन काखा वर केल्याचं चित्रं आहे.

# प्रश्न पुनर्वसनाचे

पनवेलच्या अश्विनी म्हात्रे सांगतात, ''कोरोनाने पतीचं निधन झालं तेव्हा माझी मुलगी सहा वर्षांची होती. माझं वय जेमतेम पंचवीस. माझ्या कुटुंबावर मोठंच संकट कोसळलं. एका महिन्यात कुटुंबातले पाच जण कोविडने वारले. माझं मन सैरभैर झालेलं. घरातील कर्ती माणसं गमावली. शिवाय त्यांच्या उपचारांसाठी कर्ज झालं. दागिनेही विकावे लागलेले. आता कुठं जायचं, पुढं काय करायचं काहीच कळत नव्हतं. माझे पती रेल्वे स्टेशनवर सिडको मार्फत हाऊस किपींग डिपार्टमेंटला होते. सिडकोनं ५० लाखांची नुकसान भरपाई देण्याचं जाहीर केलेलं. पण माझे पती कंत्राटी कामगार होते. त्यामुळं ही मदत मिळणार नाही, असं नंतर कळवलं. त्यातल्या त्यात नवऱ्याच्या जागी नोकरी मिळाली. हेच माझं नशीब!''

**कोविडमुळं विधवा झालेल्या अनेक मुली पूर्वी घराबाहेर पडलेल्या नव्हत्या. सरकारी मदत मिळवण्यासाठी या महिलांना खूप धडपड करावी लागली. तलाठ्याकडून एखादा कागद तयार करायचाय, रेशनींग कार्ड काढायचंय, अशा कामांसाठी अनेक अडचणी येत होत्या. साधी ५० हजारांची मदत मिळायला वर्ष/दीड वर्ष गेलं. बऱ्याच जणींना शासकीय मदतीची कल्पनाही नव्हती. एखाद्या संस्थेकडून माहिती मिळाल्यानंतर त्या महिलांची हालचाल सुरू व्हायची. पण शासनानं पुढाकार घेऊन या महिलांना आधार दिला नाही. उलट कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी भरपूर अडवणूक केलीय.**

**- चेतन वाघ, युवा संस्था**





# कोरोना एकल महिला पुनर्वसन समिती

कोविड विधवांच्या पुनर्वसनाचा प्रश्न लेखक-कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी यांच्या पुढाकाराने अधोरेखित झाला. त्यांनी कोरोना एकल महिला पुनर्वसन समिती स्थापन केली. कोविडच्या दुसऱ्या लाटेनंतर समितीने एकल महिलांना विविध शासकीय योजनांची माहिती दिली. रोजगार मुलांचं शिक्षण, भावनिक आधार अशा विविध पातळ्यांवर समितीने काम केलं. पुनर्विवाहासारख्या प्रश्नाबाबत मानसिकता बदलण्यासाठीही प्रयत्न केले. तसेच, या महिलांच्या प्रश्नांबाबत राज्य स्तरावर धोरणात्मक निर्णय व्हावे, म्हणून शासनाशी समन्वयही साधला. या कार्याचा अहवाल समितीने प्रसिद्ध केलाय. त्यानुसार दोन वर्षांच्या प्रयत्नातून समितीला सुमारे ५८०५ महिलांचं पुनर्वसन करता आलंय.

### कोरोना एकल महिला पुनर्वसन समितीची निरीक्षणं

- असंघटित क्षेत्रातील व तरुण विधवांची संख्या अधिक आहे.
- अनेक महिला कर्जाच्या विळख्यात अडकल्यात.
- अनेक कुटुंबांमध्ये नातेवाईकांकडून दुर्लक्ष होतंय.
- बहुतांश विधवा कमी शिक्षणामुळे शासकीय योजनांपासून वंचित आहेत.
- पुनर्विवाहात अनेक अडचणी येताहेत.
- या विधवांना मालमत्तेचा अधिकार मिळण्यात अडचण येतेय.

कोविड विधवांचे प्रश्न आपल्या सामाजिक आरोग्याचे प्रश्न आहेत. आपण किती 'आजारी' आहोत हे कोविड विधवा आपल्याला सांगताहेत. उपचार करायचे की नाही, हे आपण कधी ठरवणार?

Design:SwapnaDeepCreatives,Pune

पत्रव्यवहारासाठी पत्ता: साथी, फ्लॅट नं.- ३ व ४, अमन ई टेरेस, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे-३८.
दूरध्वनी : ०२०- २५४ ७२३२५, ई-मेल - sathicehat@gmail.com